महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022
दूरध्वनी क्र.0712- 2959381 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

कृपया प्रकाशनार्थ | दि. 22 ऑगस्ट 2023

# ‘महाज्योती’तर्फे आयबीपीएस–एलआयसीच्या अधिकारी पदासाठी पूर्वतयारी प्रशिक्षण

- **राज्यातील 600 विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षणासह मिळणार दरमाह 6 हजार विद्यावेतन**

- **नागपूर–संभाजीनगरात प्रत्येकी 300 उमेदवार घेतील धडे**

नागपूर : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या संस्थेमार्फत इतर मागास वर्ग विमुक्त जाती–भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकयुगात समान संधी प्राप्त व्हावी याकरिता परीक्षेची पूर्वतयारीकरिता प्रशिक्षण देण्यात येते. याचाच भाग म्हणून यंदा 2023–24 सालात इन्स्टिट्यूशन ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शनच्या (आयबीपीएस) प्रोबेशनरी ऑफिसर (पीओ) तसेच भारतीय जीवन बीमा निगम (एलआयसी)तर्फे असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर (एएओ) या पदासाठी महाज्योतीमार्फत नागपूर व छत्रपती संभाजी नगर या दोन शहरात एकूण 600 विद्यार्थ्यांना मोफत अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना येत्या 21 स्पटेंबर 2023 पर्यंत ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. विशेष म्हणजे, 6 महिने घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणासाठी महाज्योतीतर्फे निवड झालेल्या विद्यार्थी ज्यांची हजेरी 75 टक्के असणार अश्यांना दरमाह 6 हजार रूपए विद्यावेतन संस्थेमार्फत देण्यात येणार आहे. अशी माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश खवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

त्यांनी सांगितले की, महाज्योती या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँक आणि एलआयसीच्या होणाऱ्या अधिकारी पदांच्या परीक्षेत यश प्राप्त करण्यासाठी सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवार हा इतर मागास वर्ग विमुक्त जाती–भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गापैकी असावा. तसेच उमेदवार हा नॉन क्रिमीलेअर उत्पन्न गटातील असावे. जे विद्यार्थी हे पदवीचे शिक्षण पूर्ण केलेल्या किंवा पदवीच्या अंतिम वर्षाला असणारे विद्यार्थी सुद्धा या प्रशिक्षणाकरिता ऑनलाईन अर्ज करू शकतात. उपरोक्त होणाऱ्या प्रशिक्षणाकरिता 30 टक्के जागा महिलांसाठी आरक्षित आहे. तसेच अनाथांसाठी 1 टक्के जागा आरक्षित करण्यात आली आहे. या प्रशिक्षणाची वयोमर्यादा ही 20 ते 33 असणार असल्याचेही महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश खवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले.

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022
दूरध्वनी क्र.0712- 2959381 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

## ▪ 21 सप्टेंबरपर्यंत मागविले ऑनलाईन अर्ज

महाज्योतीच्या संकेतस्थळावर सूचना फलक (नोटीस बोर्ड) या पर्यायात जाऊन 'आयबीपीएस–पीओ, एलआयसी–एएओ–2023–24' ला भेट द्यायची आहे. यानंतर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार. तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच विद्यार्थ्यांचा अर्ज हा स्वीकृत होणार. तसेच पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी परीक्षा घेऊन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार, अशी माहिती महाज्योतीतर्फे देण्यात आली.

## ▪ अर्ज करतांना लागणार ही कागदपत्रे

इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना आधार कार्ड, जातीचा प्रमाणपत्र, वैध नॉन–क्रिमिलेअर प्रमाणपत्र, 12 वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र, पदव्युत्तर उत्तीर्ण गुणपत्रक किंवा पदव्युत्तरच्या शेवटचा वर्षाचे प्रमाणपत्र, दिव्यांग असल्यास 40 टक्के पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला आणि बँकेचे खाते जे आधारकार्ड क्रमांकाशी संलग्न असावेत, असेही महाज्योतीतर्फे कळविण्यात आले आहे.

## ▪ अधिक माहितीसाठी कॉल सेंटरची सुविधा

अर्ज भरतांना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नये म्हणून महाज्योतीतर्फे कॉल सेंटरची सुविधा सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी 0712–2870120/21 या संपर्क क्रमांकावर किंवा इमेल आईडी : महाज्योतीनीट24 @जिमेल.कॉम वर आपल्या अर्जातील साशंकता दुरु करता येणार. विद्यार्थ्यांना 31 सप्टेंबर 2023 पर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे. टपाल किंवा ई–मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही, असेही महाज्योतीकडून सांगण्यात आले आहे.

प्रति,
मा. संपादक
प्रिंट, ईलेक्ट्रॉनिक, डिजीटल माध्यम
उपरोक्त वार्ताकन आपल्या लोकप्रिय माध्यमात प्रसिद्धी करावे.

कुणाल शिरसाठे
प्रकल्प व्यवस्थापक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर